**ठळक बातम्या**

- दावोसमध्ये सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत राज्यात गुंतवणुकीसाठी साडे ४ लाख ३१ हजार कोटी रुपयांचे करार, ३२ हजारांहून अधिक रोजगार निर्मिती
- छत्तीसगड आणि ओडिशामध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईत २३ नक्षलवादी ठार, १ कोटी रुपयांचं बक्षिस असलेल्या चलपतीचाही समावेश
- जागतिक आरोग्य संघटना आणि पॅरिस हवामान करारातून अमेरिका बाहेर, बिगर अमेरिकी रहिवाशांच्या अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना आता आपोआप नागरिकत्व नाही

**आणि**

- तुर्कीच्या वायव्य भागात हॉटेलला लागलेल्या आगीत ६६ जणांचा मृत्यू, ५१ जण जखमी

**<><><><><>**

दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्रातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज एकंदर ४ लाख ३१ हजार कोटी रुपयांच्या विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. यातून सुमारे ३२ हजार रोजगार उपलब्ध होतील.

**होल्ड व्हाइस कास्ट...**

*( जेएसडब्ल्यू समूहासोबत झालेल्या सामंजस्य करारातून ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक गडचिरोलीत होणार आहे. याअंतर्गत अडीच कोटी टन क्षमतेचा अत्याधुनिक पर्यावरणस्नेही पोलाद प्रकल्प कंपनी उभारणार आहे. याशिवाय छत्रपती संभाजीनगरमध्ये*

*ग्रीन मोबिलिटी, विद्युत बस, ट्रक आणि परवडण्याजोग्या इलेक्ट्रिक गाड्यांचं उत्पादन कंपनी करणार आहे. याअंतर्गत विविध क्षेत्रांमध्ये १० हजार रोजगार निर्माण होतील.*

*ब्लॅकस्टोन-पंचशील रिअल्टी यांच्यासोबत मुंबई महानगर क्षेत्रासाठी एकंदर दीड हजार रोजगार देणाऱ्या ५० हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारांवरही स्वाक्षऱ्या झाल्या. वारी एनर्जी या कंपनीसोबत हरित ऊर्जा आणि सौरऊर्जा क्षेत्रात ३० हजार कोटी रुपयांचा, आणि साडेसात हजार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा सामंजस्य करार आज झाला.*

*कल्याणी उद्योगसमूह संरक्षण, पोलाद आणि इलेक्ट्रॉनिक वाहनांचा प्रकल्प गडचिरोलीत सुरू करणार आहे. यासाठी ५ हजार २५० कोटी रुपयांची गुंतवणूक करुन चार हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्माण होणार आहेत.*

*रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरसोबत १६ हजार ५०० कोटी रुपयांचा सामंजस्य करारही झाला. याअंतर्गत रत्नागिरीत सुमारे अडीच हजार रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. बालासोर ॲलॉय या कंपनीसोबत पोलाद आणि धातू या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीसाठी १७ हजार कोटी रुपयांचा करार झाला. यामुळे रायगड जिल्ह्यातल्या दिघी बंदर परिसरात ३ हजार २०० रोजगार निर्माण होणार आहेत.*

*विराज प्रोफाइल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबतही पोलाद आणि धातू क्षेत्रात १२ हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला. यामुळे पालघरमध्ये साडेतीन हजार जणांना रोजगार मिळेल. तसंच एबी इनबेव्ह या जगातल्या सर्वात मोठ्या ब्रुअरीसोबतही महाराष्ट्र सरकारनं छत्रपती संभाजीनगरमध्ये २५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठीचा सामंजस्य करार केला. याव्यतिरिक्त संरक्षण क्षेत्रात टेम्बो या कंपनीसोबत १ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. यातून तीनशे जणांना रोजगार मिळेल.*

*याव्यतिरिक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विविध कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांचीही भेट घेतली, आणि महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा केली. )*

**<><><><><>**

देशातली बंदरे, क्षमता बांधणीत गुंतवणूक करण्याबरोबरच वाढत्या कंटेनर वाहतुकीवर योग्य तोडगा काढत असल्याचं केंद्रीय बंदरे मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. मुंबईतल्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाची क्षमता वाढवण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. त्यांच्या उपस्थितीत वाढवण बंदराच्या विकासासाठीच्या व्हीपीपीएल आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांच्यातल्या सामंजस्य करारावरही स्वाक्षऱ्या झाल्या. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च ६४५ कोटी रुपये असून तो २०३० मध्ये सुरु होईल. त्यांनी २८४ कोटी रुपयांच्या कृषी प्रक्रिया सुविधेचं उद्घाटनही केलं.

**<><><><><>**

देशाच्या अवकाश अर्थव्यवस्थेनं आठ अब्ज डॉलर्सचा टप्पा गाठला असून पुढच्या दशकात ती ४४ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल असा अंदाज असल्याचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंह यांनी आज सांगितलं. ते इलेक्ट्रॉनिक माध्यमातल्या मुलाखतीत बोलत होते.

**<><><><><>**

विधिमंडळाचं कामकाज विनाअडथळा चालवत, गुणवत्तापूर्ण चर्चा घडवून आणण्याचा संकल्प पाटणा इथं आयोजित ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत करण्यात आला. आजच्या समारोपाच्या दिवशी या परिषदेनं पाच संकल्प केले.

राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संविधानाचं महत्व सांगण्यासाठी देशभरातल्या विधिमंडळांचे सदस्य समाजाच्या सर्व स्तरात जातील, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी परिषदनेनंतर वार्ताहरांशी बोलताना

सांगितलं. सर्व सदस्य पंचायत राज संस्था, नागरी स्थानिक संस्था, सहकारी संस्था आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न करतील. या परिषदेनं डिजिटल तंत्रज्ञानासह कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करण्याचा संकल्प केला आहे असं बिर्ला यांनी सांगितलं. परिषदेचा भारतीय संविधानावर विश्वास असून विधिमंडळाचं कामकाज संविधानानुसार चालवण्याचा संकल्प सर्व पीठासीन अधिकाऱ्यांनी केला असल्याचं सभापती म्हणाले. देशातल्या २३ विधिमंडळातले ४१ पीठासीन अधिकारी या परिषदेत सहभागी झाले होते.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी आज शपथ घेतली. मुंबईत राजभवनात झालेल्या एका समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्यायमूर्ती आलोक आराधे यांना पदाची शपथ दिली.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या गरियाबंद जिल्ह्यात आणि ओदिशामधल्या नुआपाडा जिल्ह्यात सुरक्षा दलाच्या कारवाईत २३ नक्षलवादी मारले गेले. त्यात नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य जयराम उर्फ चलपती याचाही समावेश आहे. त्याच्यावर १ कोटी रुपयांचं बक्षीस होतं. या कारवाईत ठार झालेल्या दोन महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह काल, तर १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह आज ताब्यात घेण्यात आले. सुरक्षा दलाने घटनास्थळावरून एका रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केला आहे. पोलीस आज या परिसरात व्यापक शोधमोहीम राबवत आहेत.

नक्षलमुक्त भारत अभियानाच्या दृष्टीने सुरक्षा दलाचं हे मोठं यश असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नक्षलवाद आपल्या शेवटच्या घटका मोजत आहे, असं शहा म्हणाले.

**<><><><><>**

उत्तर काश्मीरात बारामुल्ला जिल्ह्यात झालुरा सोपोर वन क्षेत्रात दहशतवाद्यांविरुद्ध सुरक्षा दलांनी सुरू असलेली गुज्जरपती मोहीम आज तिसऱ्या दिवशी संपली. चकमकीदरम्यान काल गंभीररीत्या जखमी झालेला एक जवान शहीद झाला.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी माजी अध्यक्ष जो बायडन यांनी काढलेले ७८ धोरणात्मक आदेश मागे घेतले आहेत. तसंच काही आदेश नव्यानं लागू केले आहेत. अमेरिकेत बेकायदा वास्तव्याला असलेल्यांच्या तसंच पर्यटक, विद्यार्थी आणि वर्क व्हिसावर आलेल्यांच्या मुलांना जन्मामुळे आपोआप मिळणारं नागरिकत्व रद्द करण्याचा आदेश ट्रम्प यांनी दिला आहे.

अमेरिका संस्थापक सदस्य असलेल्या जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याचा आदेश ट्रम्प यांनी जारी केला आहे. कोविड काळातली परिस्थिती या संघटनेनं चुकीच्या पद्धतीनं हाताळली आणि तत्काळ गरज असलेल्या उपाययोजना आखण्यात या संघटनेला अपयश आल्याचं कारण त्यांनी आदेशात दिलं आहे. तसंच पॅरिस हवामान करारातून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू करण्याच्या आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली आहे. जागतिक आरोग्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर टेड्रॉस घेब्रेयेसस यांनी ट्रम्प यांच्या आदेशाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. अमेरिका हा या

संघटनेचा सगळ्यात मोठा देणगीदार असून अमेरिका त्यातून बाहेर पडल्यामुळे भविष्यात जागतिक आरोग्य निधी उभारताना अनेक अडचणी येतील असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या धोरणांचे पडसाद आज देशातल्या शेअर बाजारांवर उमटले. जागतिक व्यापारासाठी ब्रिक्स राष्ट्रांना लक्ष्य करून अमेरिकन डॉलवरचं अवलंबित्व कमी करणाऱ्या देशांवर १०० टक्के कर लादण्याच्या ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारताच्या दोन्ही शेअर बाजारांमध्ये तीव्र घसरण पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर १ हजार २३५ अंकांची घसरण झाली, आणि तो ७५ हजार ८३८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३२० अंकांची घसरण नोंदवत २३ हजार २४ अंकांवर बंद झाला. निफ्टी आज दिवसभरात २३ हजारांखाली पोहोचला होता. या घसरणीमुळे गुतंवणूकदारांचं ७ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झालं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या आर जी कार रुग्णालयातल्या डॉक्टरवर बलात्कार आणि खून प्रकरणात आरोपी संजय राय याला जन्मठेपेची शिक्षा देण्याच्या विशेष न्यायालयाच्या निर्णयाला पश्चिम बंगाल सरकारने कोलकता उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. राय याला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी सरकारने केली आहे.

**<><><><><>**

तुर्कीच्या वायव्य भागात असलेल्या एका स्की रिसॉर्टमधल्या हॉटेलला आग लागल्याने ६६ जणांचा मृत्यू झाला तर ५१ जण जखमी झाले. आज सकाळी ही आग लागली. या हॉटेलमध्ये वास्तव्याला आलेल्या २३० पाहुण्यांची सुखरुप सुटका करण्यात आली आहे.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीत सर्बियाचा नोव्हाक ज्योकोविच यानं स्पेनच्या कार्लोस अल्काराज याच्यावर ४-६, ६-४, ६-४, ६-३ अशी मात करून उपांत्य फेरीत धडक मारली. उपांत्यपूर्व फेरीच्या दुसऱ्या सामन्यात जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्ह यानं अमेरिकेच्या टॉमी पॉलला ७-६, ७-६, २-६, ६-१ नमवत उपांत्य फेरी गाठली.

महिला एकेरीत अग्रमानांकित अरीना साबालेंका हिनं अनास्ता-शिया पावलु-चेन्कोवा हिच्यावर ६-२, २-६, ६-३ अशी मात करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. तत्पूर्वी स्पेनच्या पॉला बाडोसा हिनं जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या अमेरिकेच्या कोको गॉफला ७-५, ६-४ असं हरवलं आणि उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं.

तर मिश्र दुहेरीत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याची चीनची जोडीदार झांग शुआई यांना ऑस्ट्रेलियाच्या जोडीनं २-६, ६-४, ११-९ असं नमवलं.